प्रल्हाद जोशी लक्ष्य

बलात्काऱ्यांचे समर्थन केल्याचा आरोप; राहुल-प्रियंका आक्रमक

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

भारताच्या शिक्षणमंत्र्यांकडे पाहा. भाजप अशा व्यक्तीची नियुक्ती करते, जी बलात्कार करणाऱ्यांचा बचाव करते. ती अत्यंत नीच प्रवृत्तीची व्यक्ती आहे. जो माणूस म्हणतो की, बलात्कार करणाऱ्यांना संरक्षणाची गरज आहे, त्यापेक्षा नीच माणूस दुसरा कोणीही असू शकत नाही आणि आज तेच भारताचे शिक्षणमंत्री आहेत. मंत्रिमंडळात इतके लोक आहेत, पंतप्रधान त्यापैकी कोणाचीही निवड करू शकले असते; पण, त्यांनी अशा व्यक्तीची निवड केली जी बलात्कार करणाऱ्यांचे संरक्षण करते.
- राहुल गांधी, विरोधी पक्षनेते, लोकसभा

नवी दिल्ली : लोकसभेमध्ये परीक्षांमधील गैरव्यवहारविरोधी दुरुस्ती विधेयकावरील चर्चेदरम्यान आणि त्यापूर्वी विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि वायनाडच्या खासदार प्रियंका गांधी-वढेरा यांनी केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांच्यावर टीका केली.

प्रियंका म्हणाल्या, ''पंतप्रधान मोदींनी नवे शिक्षणमंत्री म्हणून अशा व्यक्तीची निवड केली, ज्यांनी एका गर्भवती महिलेवर बलात्कार करणाऱ्यांच्या सुटकेचे समर्थन केले होते. या निर्णयाद्वारे पंतप्रधानांनी देशातील कोट्यवधी मुलींना कोणता संदेश दिला आहे? हा संदेश अगदी स्पष्ट आहे, त्यात कोणतीही संदिग्धता नाही.''

प्रियंका गांधींनी टीका केली तेव्हा प्रल्हाद जोशी लोकसभेत उपस्थित होते. त्यांनी प्रियंका यांच्या विधानावर तीव्र आक्षेप घेतला व आरोप फेटाळून लावले. प्रियंकांनी आपली विधाने पडताळून पाहायला हवी होती. त्यांनी केलेले आरोप लोकसभेत प्रमाणित केले पाहिजेत. चुकीची माहिती पसरवली जात असून त्याबाबत कारवाई व्हायला हवी. कोणीही काहीही बोलावे असे होऊ शकत नाही. मी हे आरोप फेटाळून लावतो. प्रियंका यांनी माफी मागितलीच पाहिजे, असा प्रतिवाद जोशींनी केला.

टीकेची पूर्वपीठिका

२००२च्या गुजरात दंगलीदरम्यान बिल्किस बानो यांच्यावर बलात्कार आणि त्यांच्या कुटुंबाची हत्या केल्याप्रकरणी जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या ११ जणांची २०१८मध्ये मुदतपूर्व सुटका करण्यात आली होती. त्यावेळी २०१८मध्ये जोशी संसदीय कामकाजमंत्री होते. या निर्णयाचा बचाव करताना जोशींनी, दोषींच्या तुरुंगातील चांगल्या वर्तनाचे कारण देत सुटकेचे समर्थन केले होते. सरकार आणि संबंधितांनी हा निर्णय घेतला असेल तर चुकीचे नाही. ही कायद्याची प्रक्रिया आहे, असे जोशींनी म्हटले होते. पुढे २०२४मध्ये सर्वोच्च न्यायालयाने ही मुदतपूर्व सुटका रद्द केली होती.

उरीमध्ये सुरुंगस्फोट, दोन जवान जखमी

श्रीनगर : जम्मू आणि काश्मीरच्या उरी सेक्टरमध्ये नियंत्रण रेषेजवळ झालेल्या सुरुंगाच्या स्फोटात दोन जवान जखमी झाले, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. बारामुल्ला जिल्ह्यातील कमकलोट येथे एका चौकीजवळ हा स्फोट झाला. जखमी जवानांना प्रथमोपचार करून लष्करी रुग्णालयात दाखल करण्यात आले. स्फोटाच्या कारणाचा शोध घेतला जात असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. उरीचा हा भाग नियंत्रण रेषेजवळ असल्यामुळे तिथे मोठ्या प्रमाणात सुरक्षा व्यवस्था तैनात असते.

साखरसाठ्यावर केंद्राचे निर्बंध

३० दिवसांपेक्षा जास्त साठा ठेवण्यास मनाई

पीटीआय, नवी दिल्ली

सूट कुणाला?

सार्वजनिक वितरण प्रणाली (पीडीएस)अंतर्गत रास्त भाव दुकानांमार्फत वितरणासाठी केंद्र किंवा राज्य सरकारच्या वतीने साठविण्यात आलेल्या साखरेला या निर्बंधांतून सूट देण्यात आली आहे. तसेच, राज्य सरकारने नियुक्त केलेल्या व्यापाऱ्यांनाही ही सूट लागू असेल.

अपुऱ्या पावसाच्या अंदाजाच्या पार्श्वभूमीवर देशात साखरेचे दर नियंत्रणात ठेवण्यासाठी आणि सणासुदीच्या काळात संभाव्य तुटवडा टाळण्यासाठी केंद्र सरकारने साखर व्यापाऱ्यांवर नवीन निर्बंध लागू केले आहेत.

देशात १ ऑगस्टपासून साखर व्यापाऱ्यांना साखरेचा साठा ३० दिवसांपेक्षा अधिक काळ ठेवता येणार नाही. तसेच, कुठेही एकावेळी ४,००० क्विंटलपेक्षा अधिक साखरेचा साठा ठेवण्यासही बंदी घालण्यात आली आहे. हे निर्बंध ३० नोव्हेंबरपर्यंत लागू राहतील.

अन्न व ग्राहक व्यवहार मंत्रालयाने मंगळवारी राजपत्रात यासंदर्भातील अधिसूचना प्रसिद्ध केली. अत्यावश्यक वस्तू कायदा, १९५५ आणि साखर (नियंत्रण) आदेश, २०२५ अंतर्गत मिळालेल्या अधिकारांचा वापर करून हे निर्बंध लागू करण्यात आले आहेत. साखर व्यापाऱ्यांनी आपल्या साठ्याची माहिती सरकारच्या ऑनलाइन पोर्टलवर जाहीर करून ती नियमित अद्ययावत ठेवणे बंधनकारक करण्यात आले आहे. साठा किती दिवस ठेवला आहे, याची गणना करताना साखर प्राप्त झाल्याचा दिवसही ग्राह्य धरण्यात येणार आहे.

पंतप्रधानांना वाचवण्याचे पाऊल!

प्रधानांच्या राजीनाम्यावरून अखिलेश यादव यांची आक्रमक टीका

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

जंतर-मंतरवरील विद्यार्थी आंदोलन हे पहिले असे आंदोलन होते, ज्यात पालकांनी आपल्या मुलांना सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन दिले होते. मी खोटे बोलत आहे असे वाटत असेल तर गृहमंत्र्यांना बोलावून माझे म्हणणे चुकीचे आहे की नाही याची खात्री करून घ्या.
- अखिलेश यादव, अध्यक्ष, समाजवादी पक्ष

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदींना वाचवण्यासाठी धर्मेंद्र प्रधानांचा

राजीनामा घेतला गेला, अशी खरमरीत टीका समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांनी केली. ''जे राम मंदिरातील चोरी रोखू शकले नाहीत, ते पेपरफुटी कशी रोखू शकतील,'' असा टोमणा मारत, तरुण पिढीचे मनोधैर्य आणि त्यांची एकता यामुळे अखेरीस सरकारला झुकावे लागले, त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो, असे अखिलेश म्हणाले.

राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील घटक पक्षांनाही आंदोलनामुळे नरमाईची भूमिका घ्यावी लागल्याचे मंगळवारी स्पष्ट झाले. एकनाथ शिंदे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना ८ लाखांचे वार्षिक उत्पन्न असणाऱ्या ईडब्ल्यूएस, एससीबीसी, ओबीसी वर्गातील मुलींना उच्च शिक्षण मोफत करण्याचा निर्णय घेतला होता, अशाच प्रकारे केंद्र सरकार देखील योजना राबवू शकते, अशी सूचना शिवसेनेचे (शिंदे गट) खासदार श्रीकांत शिंदे यांनी केली.

कोचिंग क्लाससाठी नियमावलीचा सल्ला

कोचिंग क्लासेसचा ५० हजार कोटींचा उद्योग असून २०३०पर्यंत हा उद्योग १ लाख कोटींचा टप्पा पार करेल. कोचिंग क्लासेसवर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. कोचिंग क्लासेस विद्यार्थ्यांकडून ३ लाख ते ५ लाखांचे शुल्क आकारतात. त्यामुळे कोचिंग क्लासेससाठी नियमावली असणे आवश्यक आहे, असा मुद्दा श्रीकांत शिंदे यांनी मांडला.

तेलुगू देसमच्या दोन सूचना

'रालोआ'चा आणखी एक घटक पक्ष तेलुगु देसमचे खासदार लावू श्रीकृष्ण देवरायालू यांनी मोदी सरकारला दोन सूचना केल्या. जलदगती न्यायालयांच्या वेगावर लक्ष ठेवण्याची गरज आहे, तसेच न्यायवैद्यक विभागातील रिक्त जागा तातडीने भरल्या गेल्या पाहिजेत. तपास-संबंधित प्रक्रिया जलद करण्यासाठी ही प्रक्रिया महत्त्वपूर्ण आहे, असे लावू म्हणाले. या मागण्यांची दखल घेण्याची सूचना पीठासीन अधिकारी जगदंबिका पाल यांनी संबंधित मंत्र्यांना केली.

कंगना यांच्या विद्यार्थ्यांसंबंधी विधानामुळे वाद

नवी दिल्ली : भाजपच्या खासदार कंगना राणावत यांनी निदर्शकांविरोधात समाजमाध्यमांवरून केलेल्या टिप्पणीमुळे वाद निर्माण झाला आहे. राणावत यांनी जेन-झीचा उल्लेख 'गटार पिढी' असा केला आणि त्यांच्या ध्वनिचित्रफिती पाहून आपल्याला मळमळते, असे इन्स्टाग्रामवर लिहिले. ''जंतर-मंतर येथे झालेली निदर्शने घाण, कचरा आणि कुरुपतेचे दर्शन होते,'' असे राणावत यांनी म्हटले आहे. निदर्शकांना झुरळ असे म्हणत, ''त्यांना जन्म कोणी दिला, त्यांचे पालनपोषण कोण करत आहे,'' असा प्रश्न त्यांनी विचारला. राणावत यांच्या भाषेवर काँग्रेस नेत्या रेणुका चौधरी आणि इम्रान प्रतापगढी यांनी टीका केली आहे.

जाहीर सूचना

याद्वारे जनतेस सूचना देण्यात येत आहे की, येथे खालील **अनुसूचीमध्ये** नमूद करण्यात आलेली शेतजमीन (**"मालमत्ता"**) आमचे अशील सौ. कविता सुरेश मलानी आणि सौ. सविता नागपाल (मल्होत्रा) यांच्या मालकीची असून मालमत्ता त्यांच्या प्रत्यक्ष, कायदेशीर व भौतिक ताब्यात आहे आणि ते मालमत्तेचे कायदेशीररीत्या पुरेसे हक्कादार आहेत.

याद्वारे सूचित करण्यात येत आहे की मालमत्ता ही माननिय मुंबई उच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या कायदेशीर कार्यवाहीचा विषय आहे.

याद्वारे असे सुचित करण्यात येत आहे की आमच्या अशीलांच्या पूर्व लेखी संमतीशिवाय मालमत्ता किंवा तिच्या कोणत्याही भागाबाबत कोणत्याही प्रकारचा व्यवहार, ज्यामध्ये कोणताही करार, व्यवहार, व्यवस्था किंवा समझोता यांचा समावेश आहे परंतु इतक्यापुरते मर्यादित नाही, करण्याचा प्रयत्न करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने, तसे व्यवहार केल्यास ते पूर्णपणे त्यांच्या स्वत:च्या जोखमीवर, खर्चावर आणि परिणामांची जबाबदारी स्वीकारुन केले जाईल. अशा प्रकारचा कोणताही कथित व्यवहार बेकायदेशीर व अमान्य असले आणि तो आमच्या अशीलांवर बंधनकारक राहणार नाही तसेच मालमत्तेतील आमच्या अशीलांचे अधिकार, मालकी हक्क आणि हितसंबंध यांमुळे अबाधित राहतील.

आमच्या अशीलांच्या स्पष्ट आणि पूर्व लेखी मंजुरीशिवाय, कोणत्याही तृतीय पक्षाला मालमत्तेचे प्रतिवेदन करण्याचा, मालमत्तेवर बोजा निर्माण करण्याचा, मालमत्तेची विल्हेवाट लावण्याचा, मालमत्ता हस्तांतरण करण्याचा किंवा अन्य कोणत्याही प्रकारे व्यवहार करण्याचा कोणताही अधिकार, मालकी हक्क, हितसंबंध किंवा प्राधिकार नाही.

अनुसूची
(मालमत्तेचे वर्णन)

महाराष्ट्रामधील ठाणे जिल्हयातील मुरबाड तालुक्यातील ससाणे गावात स्थित आणि वसलेले सर्व्हे / गट क्रमांक २०१ (पार्ट) (पुर्वीचे सीटीएस क्रमांक ४३/७, ४०/४, ४१/२, ४२/१, ४२/५, ४२/३ ४३/२ आणि ४३/६) असलेल्या मोजमापीत २२.५ एकर्स (एच.आर.आर. (७–०–२०)) शेतजमीनीचा सर्व तो तुकडा आणि खंड सोबत त्या जमिनीवरील मोजमापीत २,२०० चौरस फुटाचे फार्महाऊस व संरचना.

दिनांक २९ जुलै २०२६

सही/-
खैतान अँड कंपनी
वन फोर्ब्स, तिसरा आणि चौथा मजला, नंबर १ डॉ. व्ही. बी. गांधी मार्ग,
फोर्ट, मुंबई ४०० ००१, भारत
Email : litigation.mumbai@khaitanco.com

रेस्टॉरंट ब्रँड्स एशिया लिमिटेड

restaurant brands asia

सीआयएन: L55204MH2013FLC249986
नोंदणीकृत कार्यालय: २रा मजला, एबीआर एमराल्ड, प्लॉट क्र. डी–८, मार्ग क्र. १६, एमआयडीसी, अंधेरी (पूर्व), मुंबई – ४०००९३
संकेतस्थळ: www.burgerking.in | **दूरध्वनी क्र.:** +९१ २२ ७१९३ ३०००
ई–मेल: investor@burgerking.in

१३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, रेस्टॉरंट ब्रँड्स एशिया लिमिटेड ('कंपनी') च्या सदस्यांची तेरावी (१३वी) वार्षिक सर्वसाधारण सभा ('एजीएम'), वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेमध्ये नमूद केल्याप्रमाणे कामकाज निष्पदित करण्यासाठी **व्हिडिओ कॉन्फरन्सिंग** ('व्हीसी')/**इतर ऑडिओ व्हिज्युअल माध्यमांद्वारे** ('ओएव्हीएम') **गुरुवार, २० ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता** (भाप्रवे) होणार आहे.

कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने (एमसीए) त्यांच्या २२ सप्टेंबर २०२५ रोजीच्या सामान्य परिपत्रक क्र. ०३/२०२५ (या संदर्भात यापूर्वी जारी केलेल्या परिपत्रकांच्या अनुषंगाने) (**'एमसीए परिपत्रके'**) द्वारे, तसेच सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (**'सेबी'**) ने वेळोवेळी जारी केलेल्या लागू परिपत्रकांच्या आधारे, सदस्यांच्या एखाद्या सामायिक ठिकाणी प्रत्यक्ष उपस्थितीशिवाय व्हीसी किंवा ओएव्हीएम द्वारे एजीएम आयोजित करण्यास परवानगी दिली आहे. एमसीए परिपत्रके आणि कंपनी कायदा, २०१३ तसेच सेबी (सूचीबद्धतेची बंधने आणि प्रकटीकरण आवश्यकता) विनियम, २०१५ (**'सूचीबद्धता विनियम'**) मधील तरतुदींचे पालन करून, कंपनीची एजीएम व्हीसी /ओएव्हीएम द्वारे आयोजित केली जात आहे.

१. **वार्षिक अहवाल पाठवणे आणि वेबसाइटवर प्रसारित करणे :**

एमसीए आणि सेबी परिपत्रकांच्या तरतुदींचे पालन करून, कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १०२ अंतर्गत स्पष्टीकरणात्मक विधानासह वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना आणि वार्षिक अहवाल २०२५–२६, ज्यांचे ईमेल पत्ते कंपनी/रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजंट ('आरटीए')/डिपॉझिटरी सहभागी ('डीपी') यांच्याकडे नोंदणीकृत आहेत त्या कंपनीच्या भागधारकांना/सदस्यांना **मंगळवार, २८ जुलै २०२६ रोजी** इलेक्ट्रॉनिक माध्यमातून पाठवण्यात आले आहेत.

तसेच, इतर गोष्टींबरोबरच, वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना समाविष्ट, कंपनीच्या वार्षिक अहवाल २०२५–२६ ची इलेक्ट्रॉनिक प्रत, खालील वेबसाइट्सवर उपलब्ध आहे:

- कंपनीच्या www.burgerking.in वर;
- स्टॉक एक्सचेंजेस जसे की बीएसई लिमिटेडच्या www.bseindia.com वर आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड www.nseindia.com वर; आणि
- रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजंट म्हणजेच एमयूएफजी इंटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (पूर्वी लिंक इंटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड म्हणून संबोधीत) (एमयूएफजी) च्या https://instavote.linkintime.co.in/ वर.

ज्यांचे ईमेल पत्ते नोंदणीकृत नाहीत त्यांना वार्षिक अहवाल २०२५–२६ पाहण्यासाठी आवश्यक वेब लिंक आणि त्याचा मार्ग असलेले पत्र पाठविण्यात आले आहे.

२. **ई–मतदान :**

कंपनी कायदा, २०१३ चे कलम १०८ आणि कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ चे नियम २०, इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडिया द्वारे जारी केलेले सर्वसाधारण सभांविषयीचे सचिवीय मानक – २ आणि सूचीबद्धता विनियम चे विनियम ४४ यांच्या तरतुदींनुसार, कंपनी आपल्या भागधारकांना/ सदस्यांना एजीएम मध्ये हाताळल्या जाणाऱ्या कामकाजाबाबत रिमोट ई–व्होटिंग (सभेपूर्वीचे ई–मतदान) आणि एजीएम दरम्यानचे ई–मतदान अशा दोन्ही सुविधा उपलब्ध करून देत आहे. या उद्देशासाठी, इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे मतदानाची सुविधा देण्यासाठी कंपनीने एमयूएफजी ची नियुक्ती केली आहे. ई–मतदानाचे तपशील खालीलप्रमाणे आहेत:

- ज्या व्यक्तीचे नाव सदस्यांच्या नोंदणीमध्ये किंवा कंपनीच्या लाभार्थी मालकांच्या नोंदणीमध्ये कट–ऑफ तारखेला म्हणजेच **गुरुवार, १३ ऑगस्ट २०२६** रोजी नोंदवले गेले आहे, त्यांनाच दूरस्थ ई–मतदान किंवा वार्षिक सर्वसाधारण सभेदरम्यान ई–मतदानाची सुविधा मिळू शकेल.
- **दूरस्थ ई–मतदान :**

दूरस्थ ई–मतदानाची सुविधा खालील मतदान कालावधीत उपलब्ध असेल :

ई–मतदानाची सुरुवात	रविवार, १६ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९:०० वाजता भारतीय प्रमाण वेळेनुसार
ई–मतदानाची समाप्ती	बुधवार, १९ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ५:०० वाजता भारतीय प्रमाण वेळेनुसार

एमयूएफजी द्वारे त्यानंतर दूरस्थ ई–मतदान मॉड्यूलमतदानासाठी अक्षम केले जाईल.

सदस्यांचे मतदानाचे अधिकार, कट–ऑफ तारीख म्हणजे **गुरुवार, १३ ऑगस्ट २०२६** रोजी कंपनीच्या पेड–अप इक्विटी शेअर भांडवलातील त्यांच्या वाट्याच्या प्रमाणात असतील.

ज्या सदस्यांनी दूरस्थ ई–मतदानाद्वारे मतदान केले आहे ते एजीएममध्ये सहभागी होण्यास पात्र असतील आणि त्यांची उपस्थिती कोरमसाठी मोजली जाईल, तथापि अशा सदस्यांना एजीएममध्ये पुन्हा मतदान करण्याची परवानगी दिली जाणार नाही.

कोणतीही व्यक्ती, जी कंपनीचे शेअर्स खरेदी करत असेल आणि सूचना पाठवल्यानंतर कंपनीचा सदस्य बनत असेल आणि कट–ऑफ तारखेला म्हणजेच **गुरुवार, १३ ऑगस्ट २०२६** रोजी शेअर्स धारण करत असेल ती १३ व्या एजीएमच्या सूचनेत नमूद केल्याप्रमाणे दूरस्थ ई–मतदानासाठी प्रक्रिया अवलंबू शकते किंवा लॉगिन क्रेडेन्शियल्स मिळविण्यासाठी enotices@in.mpms.mufg.com वर विनंती ई–मेल पाठवू शकते.

- **वार्षिक सर्वसाधारण सभेत ई–मतदान :**

कंपनीने वार्षिक सर्वसाधारण सभेदरम्यान ई–मतदान प्रदान करण्याचा पर्याय निवडला आहे जो व्हीसी/ओएव्हीएम मंचासह एकत्रित करण्यात आला आहे आणि त्यासाठी स्वतंत्र लॉगिन आवश्यक नाही. वार्षिक सर्वसाधारण सभेदरम्यान सभेच्या अध्यक्षांच्या सूचनांनुसार ई–मतदान विंडो सक्रिय केली जाईल आणि वार्षिक सर्वसाधारण सभेत उपस्थित राहणारे आणि ज्यांनी दूरस्थ ई–मतदानाद्वारे ठरावांवर मतदान केलेले नाही आणि अन्यथा असे करण्यास प्रतिबंधित नाही, केवळ तेच शेअरधारक/सदस्य वार्षिक सर्वसाधारण सभेत ई–मतदान प्रणालीद्वारे मतदान करण्यास पात्र असतील.

३. **ई–मेल पत्ता नोंदणी करण्याची पद्धत :**

ज्या सदस्यांनी कंपनीकडे त्यांचा ई–मेल पत्ता नोंदणीकृत केलेला नाही त्यांना त्यांचा ई–मेल पत्ता नोंदणीकृत करण्यासाठी खालील प्रक्रिया अनुसरण करण्याची विनंती आहे:

डीमॅट भागधारक	भागधारकांना विनंती आहे की त्यांनी डीपीने विहित केलेल्या प्रक्रियेचे पालन करून संबंधित डीपीकडे डीमॅट होल्डिंग्जच्या संदर्भात त्यांचा ई–मेल पत्ता नोंदणीकृत करावा.
प्रत्यक्ष भागधारक	नाव, फोलिओ क्रमांक, स्व–प्रमाणित पॅनची स्कॅन प्रत, सदस्याचे नाव असलेल्या रद्द केलेल्या चेक लीफची स्कॅन प्रत आणि प्रत्यक्ष शेअर प्रमाणपत्राची स्कॅन प्रत नमूद करून investor.helpdesk@in.mpms.mufg.com या ईमेल पत्त्यावर एमयूएफजीला ईमेल करा.
वेब–पोर्टल तात्पुरती नोंदणी (डीमॅट आणि प्रत्यक्ष भागधारक)	तुमचा ई–मेल पत्ता नोंदणी करण्यासाठी https://web.in.mpms.mufg.com/EmailReg/Email Register.html/ या लिंकवर क्लिक करा.

४. **संपर्क तपशिल :**

ई–मतदान	जर भागधारकांना/सदस्यांना ई–मतदान सुविधेबद्दल /लॉगिनबद्दल काही शंका असतील, तर ते www.instavote.linkintime.co.in वर उपलब्ध असलेले वारंवार विचारले जाणारे प्रश्न आणि ई–मतदान मॅन्युअल मदत विभागाअंतर्गत पाहू शकतात किंवा श्री. राजीव रंजन, सहाय्यक उपाध्यक्ष–ई–मतदान, एमयूएफजी इनटाइम प्रायव्हेट लिमिटेड, सी १०१, एम्बेसी २४७, एल. बी. एस. मार्ग, विक्रोळी (पश्चिम), मुंबई – ४०० ०८३, यांच्याशी दूरध्वनी क्रमांक ०२२ – ४९१८ ६०००/+९१८१० ८११ ६७६७ वर संपर्क साधू शकतात किंवा enotices@in.mpms.mufg.com वर ई–मेल लिहू शकतात.
व्हीसी/ ओएव्हीएमद्वारे वार्षिक सर्वसाधारण सभा	जर भागधारकांना/सदस्यांना लॉगिनबाबत काही शंका असतील, तर ते instameet@linkintime.co.in किंवा enotices@in.mpms.mufg.com वर ईमेल पाठवू शकतात. दूरध्वनी:– ०२२–४९१८ ६०००/०२२–४९१८ ६१७५ वर संपर्क साधा.

रेस्टॉरंट ब्रँड्स एशिया लिमिटेड करीता
स्वाक्षरी/–
श्वेता मयेकर
कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी

स्थळ: मुंबई
दिनांक: २८ जुलै, २०२६

SBI स्टेट बँक ऑफ इंडिया

अनकापल्ले मेन ब्रँच (००८०५), नेहरू चौक जंक्शन, अनकापल्ले व्हिलेज व मंडळ, अनकापल्ले जिल्हा – ५३१००१. ई-मेल आयडी : sbi.00805@sbi.co.in

विक्रीपूर्वीची नोटीस

सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट रुल्स, २००२ च्या रुल ८(५) व (६) च्या तरतुदीअंतर्गत निर्गमित केलेली

प्रति,

ऋणको : मेसर्स जेहोशम्मा आईस फॅक्टरी, प्लॉट नं. १७, आयसी-पुडी व्हिलेज, रामबिली मंडलम, विशाखापट्टणम जिल्हा – ५३१०६१. **ऋणको नि हमीदार : मेसर्स जेहोशम्मा आईस फॅक्टरी, प्रतिनिधीत्व केलेले द्वारा – १ली व्यवस्थापकीय भागीदार : श्रीमती अल्लीपुरापू सुभाशिनी,** ए. देवा किरण कुमार यांची पत्नी, डी. नं. २१-२९-२०, गन्नेरू स्ट्रिट, चेंगलरावपेटा, टाऊन कोठा रोड, विशाखापट्टणम – ५३०००१. **२री व्यवस्थापकीय भागीदार : श्रीमती बेवर्ली इरिका मथियास,** एल्टोन अंथोनी मथियाज यांची पत्नी, फ्लॅट नं. ६, २रा मजला, सिंगापूर आर्केड, हिंदुजा रोड, खार (प.), मुंबई – ४०००५२, महाराष्ट्र. **३री व्यवस्थापकीय भागीदार : श्रीमती अल्लीपुरापू वेंकटा गौरी लक्ष्मी,** अल्लीपुरापू वेंकटेस्वरा राव यांची पत्नी, डी. नं. २१-२९-१९, गन्नेरू स्ट्रिट, चेंगलरावपेटा, टाऊन कोठा रोड, विशाखापट्टणम – ५३०००१. **४थी व्यवस्थापकीय भागीदार : श्रीमती अल्लीपुरापू सुगूना सुनिता,** अल्लीपुरापू देवा प्रसंथ यांची पत्नी, डी. नं. २१-२९-१९, गन्नेरू स्ट्रिट, चेंगलरावपेटा, टाऊन कोठा रोड, विशाखापट्टणम – ५३०००१.
५वी व्यवस्थापकीय भागीदार : श्रीमती अल्लीपुरापू प्रमिला, अल्लीपुरापू देवा स्वरूप यांची पत्नी, डी. नं. २१-२९-१९, गन्नेरू स्ट्रिट, चेंगलरावपेटा, टाऊन कोठा रोड, विशाखापट्टणम – ५३०००१. **६वी व्यवस्थापकीय भागीदार : श्रीमती येलमंचिली अनू राधा,** येलमंचिली नुकाराजू यांची पत्नी, डी. नं. २६-४-३/२२, एनसी बोस रोड, तानुकू – ५३४२११.
७वी व्यवस्थापकीय भागीदार : श्रीमती बुड्डुला स्वर्णा कुमारी, बुड्डुला व्ही. एस. नारायणा राव यांची पत्नी, डी. नं. ८१-१०-७/१, वेंकटेस्वरानगर, आयएमए हॉल रोड, राजाहमुंड्री (अर्बन), पूर्व गोदावरी जिल्हा – ५३३१०१. **(मुदत कर्ज खाते क्र. ३८१४९४६०२५३)**

प्रिय महोदय / महोदया

"स्टेट बँक ऑफ इंडिया"चे, अनकापल्ले मेन बँच (००८०५) नेहरू चौक जंक्शन, अनकापल्ले, अनकापल्ले जिल्हा, प्राधिकृत अधिकारी असलेल्या निम्नस्वाक्षरीकारांनी सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या रुल ३ यासह वाचलेल्या सेक्शन १३(२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत मागणी सूचनेच्या स्वीकृतीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत आनुषंगिक खर्च, किंमत, आकार आणि **०५.०४.२०२६** च्या प्रभावापासून पुढील व्याजासह **०४.०४.२०२६** रोजीप्रमाणे रू. ६३,०२,९६८/-(रुपये त्रेसष्ट लाख दोन हजार नऊशे अडुसष्ट फक्त), वजा तुमच्याद्वारा पुढील प्रदान केलेले, जर असल्यास, कर्ज रकमेची परतफेड करण्याकरिता तुमच्यावर फर्मावणारी दिनांकित **०४.०४.२०२६, आणि १३.०४.२०२६ रोजी वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेली संक्षिप्त मागणी सूचना (दि टाईम्स ऑफ इंडिया व प्रजाशक्ती – व्हीएसकेपी – आरजेवाय आवृत्त्या आणि फायनान्शियल एक्सप्रेस व लोकसत्ता – मुंबई आवृत्त्या)** मागणी सूचना निर्गमित केली आहे.

तुम्ही रकमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरला आहात आणि निम्नस्वाक्षरीकारांनी सरफेसी ॲक्ट, २००२ च्या सेक्शन १३(४) अंतर्गत रुल्सच्या रुल ८ (१) यासह वाचलेल्या, ॲक्टच्या सेक्शन १३(४) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत तुमच्याद्वारा गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा ताबा घेतला होता. ताबा सूचना ऋणकोंना दिनांकित **१५.०६.२०२६** रोजी निर्गमित केल्या आहेत आणि **२१.०६.२०२६** रोजीप्रमाणे वृत्तपत्रात **(दि टाईम्स ऑफ इंडिया व प्रजाशक्ती – व्हीएसकेपी – आरजेवाय आवृत्त्या आणि फायनान्शियल एक्सप्रेस व लोकसत्ता – मुंबई आवृत्त्या)** प्रसिद्ध केल्या होत्या व **पीएन सूचना निर्गमित केलेली अखेरची शिल्लक, सध्या अखेरची शिल्लक १६.०६.२०२६ च्या प्रभावापासून पुढील व्याजासह १५.०६.२०२६ रोजीप्रमाणे रु. ६६,५१,९२९/-** (रुपये सहासष्ट लाख एकावन्न हजार नऊशे एकोणतीस फक्त) आहे आणि अन्य आनुषंगिक खर्च, इ., रुल्सच्या रुल ८(२) अंतर्गत आवश्यकतेनुसार.

तुम्हास याद्वारा कळविण्यात आले आहे की, याखाली वर्णिल्यानुसार बँकेकडे गहाण असलेल्या मालमत्तेची विक्री जर या सूचनेच्या तारखेपासून ३० दिवसांच्या कालावधीच्या आत दिनांकित **२०.०७.२०२६** सूचनेमध्ये मागणी केल्यानुसार बँकेला देय असलेल्या रकमेचे प्रदान न केल्यास आम जनतेकडून निविदा / दरपत्रके मागवून जाहीर ई-लिलावद्वारे कोणत्याही वेळेत करण्यात येणार आहे.

सध्याची अखेरची शिल्लक २१.०७.२०२६ च्या प्रभावापासून पुढील व्याजासह, २०.०७.२०२६ रोजीप्रमाणे रु. ६७,३२,०१६/- (रुपये सदुसष्ट लाख बत्तीस हजार सोळा फक्त) आणि अन्य आनुषंगिक सरफेसी आकार, इ. आहे.

अनुसूची – "सी" जंगम व स्थावर मालमत्तेचे वर्णन

कृपया सर्व तारणगहाण मालमत्ता नमूद करावी, म्हणजेच चालू मत्ता समाविष्ट मालसाठा, पुस्तकी देणी, प्राप्य. उपभोग्य वस्तूंचे भांडार, स्पेअर्स व तारणगहाण जंगम संयंत्र व यंत्रसामग्री, इ. कागदपत्रांमध्ये नमूद केलेली (अनुसूची बी). मालसाठ्याचे तारणगहाण आणि बँकेद्वारा अर्थसहाय्यित तारणगहाण असलेली जंगम संयंत्रे आणि आयसीएफ फॅक्टरी यंत्रसामग्री, इ.

आयटम नं. १ : १. ब्लॉक आईस मशिन – १ सेट, **२.** रेफ्रिजरेशन कॉम्प्रेसर – २ नं., **३.** इव्हॅपोरेटिव्ह कंडेन्सर – १ सेट, **४.** ब्रायन ॲजीटेटर – २ सेट्स, **५.** ईलेक्ट्रिक हॉईस्ट – २ सेट्स, **६.** केबल्ससह कंट्रोल पॅनेल्स – १ सेट, **७.** उभारणी, कार्यान्वयन – १ सेट जॉब, **८.** रिव्हर्स ऑस्मोस प्लान्ट – आरओ – १ सेट, **९.** जार वॉशिंगमशिन – १ सेट, **१०.** ३१५ केएव्ही डी/ट्रान्सफॉर्मर – १ सेट, **११.** एचटी सप्लाय – सीएमडी ३०० केएव्ही – १ सेट.

बँकेद्वारा अर्थसहाय्यित खरेदी केलेली अन्य निश्चित मत्ता.

(कृपया गहाणवट कागदपत्रे / विलेख संदर्भित असलेल्या कागदपत्रांमध्ये नमूद केल्यानुसार बँकेकडे गहाण असलेल्या स्थावर मालमत्तेचा तपशील नमूद करावा (अनुसूची बी).

आयटम नं. २ : पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे – साईट मोजमापाचा विस्तार ३५८७.९७ चौ.यार्ड्स किंवा ३०००.०० चौ.मी. (फॅक्टरी जीआय शीट रुफ शेड) शेड प्लींथ एरिआ ४९०७ चौ.फू. यासह एकत्रीत, सर्व्हे नं. २५८पी, २५९पी द्वारा व्याप्त व येथे स्थित – प्लॉट नं. १७, पूडी व्हिलेज, व्हीके-पीसीपीआयआर एसडीए, रामबिली मंडळ, येल्लामंचिली एसआरओ व विशाखापट्टणम जिल्हा, **मेसर्स जेहोशम्मा आईस फॅक्टरीच्या मालकीची : प्रतिनिधीत्व केलेले द्वारा – १ली व्यवस्थापकीय भागीदार : श्रीमती अल्लीपुरापू सुभाशिनी, ए. देवा किरण कुमार यांची पत्नी, २री व्यवस्थापकीय भागीदार : श्रीमती बेवर्ली इरिका मथियास, एल्टोन अंथोनी मथियाज यांची पत्नी, ३री व्यवस्थापकीय भागीदार : श्रीमती अल्लीपुरापू वेंकटा गौरी लक्ष्मी, अल्लीपुरापू वेंकटेस्वरा राव यांची पत्नी, ४थी व्यवस्थापकीय भागीदार : श्रीमती अल्लीपुरापू सुगूना सुनिता, अल्लीपुरापू देवा प्रसंथ यांची पत्नी, ५वी व्यवस्थापकीय भागीदार : श्रीमती अल्लीपुरापू प्रमिला, अल्लीपुरापू देवा स्वरूप यांची पत्नी, ६वी व्यवस्थापकीय भागीदार : श्रीमती येलमंचिली अनू राधा, येलमंचिली नुकाराजू यांची पत्नी, ७वी व्यवस्थापकीय भागीदार : श्रीमती बुड्डुला स्वर्णा कुमारी, बुड्डुला व्ही. एस. नारायणा राव यांची पत्नी (जमीन विक्रीकरिता करारनामा विलेख क्र. ४९७८, दिनांकित ०४.१२.२०१७ आणि नोंदणी विक्री विलेख कागदपत्र क्र. ६२६०/२०१८, आणि दिनांकित १५.१०.२०१८). सीमा : पूर्व :** प्लॉट नं. १७ए, **पश्चिम :** प्लॉट नं. १८ए, **दक्षिण :** १५.०० मी. रुंद बफर झोन, **उत्तर :** ३०.०० मी. रुंद रोड. **मोजमापाची : पूर्व :** २०४'.१०'' फू., **पश्चिम :** ४०'.४'' फू., **दक्षिण :** २९३'.४'' फू., **उत्तर :** २४३'.०'' फू.

दिनांक : २०.०७.२०२६
स्थळ : अनकापल्ले,

स्वाक्षरी/– प्राधिकृत अधिकारी,
स्टेट बँक ऑफ इंडिया

जाहीर सूचना

याद्वारे जनतेस सूचना देण्यात येत आहे की, आमचे अशील हे रायगड जिल्हयामधील कर्जत तालुक्यातील, नेरळ, आवासरे गावात स्थित सर्व्हे क्रमांक ८४ गट क्रमांक ४ आणि सर्व्हे क्रमांक ४८ गट क्रमांक ८ असलेल्या मोजमापीत ७.५ एकर्स जमिनीच्या भूखंड (**"मालमत्ता"**) सौ. कविता सुरेश मलानी आणि सौ. सविता नागपाल (मल्होत्रा) यांच्या कायदेशीर मालकीचा असून मालमत्तेवर त्यांचा अविभाजीत हिस्सा, अधिकार, मालकीहक्क आणि हितसंबंध आहे व ते मालमत्तेचे पुरेसे हक्कादार आहेत तसेच मालमालमत्ता त्यांच्या प्रत्यक्ष आणि भौतिक ताब्यात आहे.

याद्वारे सूचित करण्यात येत आहे की मालमत्ता ही माननिय मुंबई उच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या कायदेशीर कार्यवाहीचा विषय आहे.

याद्वारे असे सुचित करण्यात येत आहे की आमच्या अशीलांच्या पूर्व लेखी संमतीशिवाय मालमत्ता किंवा तिच्या कोणत्याही भागाबाबत कोणत्याही प्रकारचा व्यवहार, ज्यामध्ये कोणताही करार, व्यवहार, व्यवस्था किंवा समझोता यांचा समावेश आहे परंतु इतक्यापुरते मर्यादित नाही, करण्याचा प्रयत्न करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने, तसे व्यवहार केल्यास ते पूर्णपणे त्यांच्या स्वत:च्या जोखमीवर, खर्चावर आणि परिणामांची जबाबदारी स्वीकारुन केले जाईल. मालमत्तेबाबत अशा प्रकारचा कोणताही कथित व्यवहार बेकायदेशीर व अमान्य असले आणि तो आमच्या अशीलांवर बंधनकारक राहणार नाही तसेच मालमत्तेतील आमच्या अशीलांचे अधिकार, मालकी हक्क आणि हितसंबंध यांमुळे अबाधित राहतील.

आमच्या अशीलांच्या स्पष्ट आणि पूर्व लेखी मंजुरीशिवाय, कोणत्याही तृतीय पक्षाला मालमत्तेचे प्रतिवेदन करण्याचा, मालमत्तेवर बोजा निर्माण करण्याचा, मालमत्तेची विल्हेवाट लावण्याचा, मालमत्ता हस्तांतरण करण्याचा किंवा अन्य कोणत्याही प्रकारे व्यवहार करण्याचा कोणताही अधिकार, मालकी हक्क, हितसंबंध किंवा प्राधिकार नाही.

अनुसूची
(मालमत्तेचे वर्णन)

रायगड जिल्हयामधील कर्जत तालुक्यातील, नेरळ, आवासरे गावात स्थित सर्व्हे क्रमांक ८४ गट क्रमांक ४ आणि सर्व्हे क्रमांक ४८ गट क्रमांक ८ असलेला मोजमापीत ७.५ एकर्स जमिनीचा सर्व तो तुकडा आणि खंड.

दिनांक २९ जुलै २०२६

सही/-
खैतान अँड कंपनी
वन फोर्ब्स, तिसरा आणि चौथा मजला, नंबर १ डॉ. व्ही. बी. गांधी मार्ग,
फोर्ट, मुंबई ४०० ००१, भारत
Email : litigation.mumbai@khaitanco.com

फॉर्म क्रमांक सीएए.२

[कलम २३०(३) आणि नियम ६ व ७ नुसार]
माननीय राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, खंडपीठ, मुंबई यांच्यासमोर कंपनी अर्ज सीए (सीएए) क्र. २१७/एमबी/२०२५

च्या बाबतीतः

१. **बसेरा होम फायनान्स प्रायव्हेट लिमिटेड,** ज्यांचे नोंदणीकृत कार्यालय ए-१४०४, १४ वा मजला, नमन मिडटाऊन, इंडिया बुल्सजवळ, सेनापती बापट मार्ग, एल्फिन्स्टन, पश्चिम, मुंबई शहर, मुंबई-४०००१३, महाराष्ट्र, महाराष्ट्र राज्यात आहे (पॅनः एएआयसीबी७८७२क्यू)
...(हस्तांतरण करणारी कंपनी क्र. १/अर्जदार क्र. १)

-आणि-

२. **ब्रिजकिशोर ट्रेडिंग प्रायव्हेट लिमिटेड,** ज्यांचे नोंदणीकृत कार्यालय ए-१४०४, १४ वा मजला, नमन मिडटाऊन, इंडिया बुल्सजवळ, सेनापती बापट मार्ग, एल्फिन्स्टन, पश्चिम, मुंबई शहर, मुंबई ४०००१३, महाराष्ट्र, महाराष्ट्र राज्यात आहे (पॅनः एएसीसीबी८३९३ए)
... (हस्तांतरण करणारी कंपनी क्र. २/अर्जदार क्र. २)

३. **डेक सिक्युरिटीज अँड इन्व्हेस्टमेंट्स प्रायव्हेट लिमिटेड,** ज्यांचे नोंदणीकृत कार्यालय ए-१४०४, १४ वा मजला, नमन मिडटाऊन, इंडिया बुल्सजवळ, सेनापती बापट मार्ग, एल्फिन्स्टन, पश्चिम, मुंबई शहर, मुंबई- ४०००१३, महाराष्ट्र, महाराष्ट्र राज्यात आहे (पॅनः एएएसीडी७६९८ए)
.... (हस्तांतरण करणारी कंपनी क्र. ३/अर्जदार क्र. ३)

४. **महिमा स्टॉक्स प्रायव्हेट लिमिटेड,** ज्यांचे नोंदणीकृत कार्यालय ए-१४०४, १४ वा मजला, नमन मिडटाऊन, इंडिया बुल्सजवळ, सेनापती बापट मार्ग, एल्फिन्स्टन, पश्चिम, मुंबई शहर, मुंबई - ४०००१३, महाराष्ट्र, महाराष्ट्र राज्यात आहे (पॅनः एएईसीएम२९८३के)
.... (हस्तांतरण करणारी कंपनी क्र. ४ / अर्जदार क्र. ४)

५. **शांताकरम फायनान्शियल ॲडव्हायझरी सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड,** ज्यांचे नोंदणीकृत कार्यालय ए-१४०४ येथे आहे, १४ वा मजला, नमन मिडटाऊन, इंडिया बुल्सजवळ, सेनापती बापट मार्ग, एल्फिन्स्टन, पश्चिम, मुंबई शहर, मुंबई-४०००१३, महाराष्ट्र राज्य (पॅनः एएक्यूसीएस७९७४जे)
...(हस्तांतरण करणारी कंपनी क्र. ५ / अर्जदार क्र. ५)

६. **साऊंड कॅपिटल मार्केट्स लिमिटेड,** ज्यांचे नोंदणीकृत कार्यालय ए-१४०४, १४ वा मजला, नमन मिडटाऊन, इंडिया बुल्सजवळ, सेनापती बापट मार्ग, एल्फिन्स्टन, पश्चिम, मुंबई शहर, मुंबई ४०००१३, महाराष्ट्र, महाराष्ट्र राज्यात आहे (पॅनः एएसीसीएस२०९३जे)
... (हस्तांतरण करणारी कंपनी क्र. ६ / अर्जदार क्र. ६)

७. **चार्टर्ड फायनान्स अँड लीझिंग लिमिटेड,** ज्यांचे नोंदणीकृत कार्यालय ए-१४०४, १४ वा मजला, नमन मिडटाऊन, इंडिया बुल्सजवळ, सेनापती बापट मार्ग, एल्फिन्स्टन, पश्चिम, मुंबई शहर, मुंबई - ४०००१३, महाराष्ट्र, महाराष्ट्र राज्यात आहे (पॅनः एएबीसीसी०७७७सी)
...(हस्तांतरित कंपनी / अर्जदार क्र. ७)

हस्तांतरक कंपनी क्र. ४ / अर्जदार कंपनी क्र. ४ च्या इक्विटी भागधारकांच्या आणि प्राधान्य भागधारकांच्या सभेच्या सूचनेची जाहिरात

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, **कंपनी अर्ज सीए (सीएए)** क्रमांक... मध्ये दिनांक २१ जुलै, २०२६ रोजीच्या आदेशान्वये, दिनांक २४ जून, २०२६ रोजीच्या आदेशान्वये... माननीय राष्ट्रीय **कंपनी कायदा न्यायाधिकरणाच्या मुंबई खंडपीठाने, २१७/एमबी/२०२५** या आदेशानुसार, हस्तांतरक कंपनी क्र. ४/अर्जदार कंपनी क्र. ४ च्या **इक्विटी शेअरधारकांच्या** आणि **प्रेफरन्स शेअरधारकांच्या** सभा घेण्याचे निर्देश दिले आहेत. या सभांचा उद्देश अर्जदार कंपन्यांमधील प्रस्तावित विलीनीकरण योजनेवर विचार करणे आणि योग्य वाटल्यास, ०१ एप्रिल, २०२४ या नियुक्त तारखेपासून सुधारणांसह किंवा सुधारणांशिवाय तिला मंजुरी देणे हा आहे. सदर आदेशाच्या अनुषंगाने आणि त्यात निर्देशित केल्यानुसार, याद्वारे पुढील सूचना देण्यात येत आहे की, हस्तांतरक कंपनी क्र. ४/अर्जदार कंपनी क्र. ४ च्या इक्विटी शेअरधारकांची आणि **प्रेफरन्स शेअरधारकांची** सभा खाली नमूद केलेल्या दिवशी, तारखेला आणि वेळेला प्रत्यक्षपणे आयोजित केली जाईल. या वेळी हस्तांतरक कंपनी क्र. ४/अर्जदार कंपनी क्र. ४ च्या **इक्विटी शेअरधारकांना** आणि **प्रेफरन्स शेअरधारकांना** सभेच्या ठिकाणी उपस्थित राहण्याची आणि सभा बोलावणाऱ्या सूचनेमध्ये असलेल्या ठरावावर मतदान करण्याची विनंती करण्यात येत आहे.

बैठकीचे स्वरूपः प्रत्यक्ष
सभेचे ठिकाणः पाचवा मजला, ५०१ आणि ५०२, एव्हरेस्ट हाऊस, ६ सुरेन रोड, अंधेरी पूर्व कार्यालय क्रमांक ५०१, मुंबई-४०००९३
सभेची तारीखः २९.०८.२०२६.

बैठकांचा तपशील	वेळ
इक्विटी शेअरधारक	
महिमा स्टॉक्स प्रायव्हेट लिमिटेड हस्तांतरण करणारी कंपनी / अर्जदार कंपनी क्रमांक ४	सकाळी ११.३०
प्राधान्य भागधारक	
महिमा स्टॉक्स प्रायव्हेट लिमिटेड हस्तांतरण करणारी कंपनी / अर्जदार कंपनी क्र. ४	दुपारी १२.३० वाजता

माननीय राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाच्या **कंपनी अर्ज सीए (सीएए) क्र. २१७/एमबी/२०२५** मध्ये दिनांक २१ जुलै, २०२६ रोजीच्या आदेशानुसार आणि दिनांक २४ जून, २०२६ रोजीच्या आदेशानुसार, हस्तांतरक कंपनी क्र. ४/अर्जदार कंपनी क्र. ४ च्या **इक्विटी शेअरधारकांच्या** आणि **प्राधान्य शेअरधारकांच्या** सभेसाठी अर्जदार कंपनी क्र. ४ ने दिनांक ३०.०६.२०२६ ही अंतिम तारीख निश्चित केली आहे. त्यानुसार, दिनांक ३०.०६.२०२६ रोजी हस्तांतरक कंपनी क्र. ४/अर्जदार कंपनी क्र. ४चे जे सर्व **इक्विटी शेअरधारक** आणि **प्राधान्य शेअरधारक** आहेत, त्यांना आदेशात नमूद केलेल्या कोणत्याही एका पद्धतीद्वारे सभेची सूचना पाठवली जाईल.

ठरावावरील मतदान सभेच्या ठिकाणी केवळ मतपत्रिकेद्वारेच होईल. कंपनीने सभेला उपस्थित राहणाऱ्या व्यक्तींना ठरावावर मतदान करता यावे यासाठी सभेच्या ठिकाणी व्यवस्था केली आहे.

योजना असलेली सदर सूचना आणि कलम २३० अन्वयेचे विवरण यांची प्रत **अर्जदार क्र. ४** च्या नोंदणीकृत कार्यालयात विनामूल्य मिळू शकेल. संबंधित सभेत उपस्थित राहण्यास आणि मतदान करण्यास पात्र असलेल्या व्यक्ती, स्वतः किंवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधींमार्फत किंवा त्यांच्या प्रॉक्सीद्वारे मतदान करू शकतात, मात्र अशी अधिकृतता / प्रॉक्सी, सभेच्या सूचनेत अधिक तपशीलवार नमूद केल्यानुसार, संबंधित सभेच्या किमान ४८ तास आधी टपालाने पाठवणे / जमा करणे आवश्यक आहे.

पुढे नोंद घ्यावी की, **कंपनी अर्ज सीए (सीएए) क्र. २१७/एमबी/२०२५** मध्ये कायद्याच्या कलम २३०(१) अंतर्गत पारित केलेल्या २१ जुलै, २०२६ रोजीच्या आदेशासह २४ जून, २०२६ रोजीच्या आदेशानुसार, माननीय राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठाने अर्जदार कंपनी क्र. १, अर्जदार कंपनी क्र. २, अर्जदार कंपनी क्र. ३, अर्जदार कंपनी क्र. ५, अर्जदार कंपनी क्र. ६ आणि अर्जदार कंपनी क्र. ७च्या इक्विटी शेअरधारकांची आणि अर्जदार कंपनी क्र. ७ च्या प्रेफरन्स शेअरधारकांची सभा रद्द केली आहे.

पुढे नोंद घ्यावी की, **कंपनी अर्ज सीए (सीएए) क्र. २१७/एमबी/२०२५** मध्ये कायद्याच्या कलम २३०(१) अंतर्गत पारित केलेल्या २१ जुलै, २०२६ रोजीच्या आदेशासह २४ जून, २०२६ रोजीच्या आदेशानुसार, माननीय राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठाने अर्जदार कंपनी क्र. ७ च्या सुरक्षित धनकोंची आणि अर्जदार कंपनी क्र. २, अर्जदार कंपनी क्र. ४, अर्जदार कंपनी क्र. ५, अर्जदार कंपनी क्र. ६ आणि अर्जदार कंपनी क्र. ७च्या असुरक्षित धनकोंची सभा रद्द केली आहे आणि हे देखील नोंदवले आहे की अर्जदार कंपनी क्र. १, अर्जदार कंपनी क्र. २, अर्जदार कंपनी क्र. ३, अर्जदार कंपनी क्र. ४, अर्जदार कंपनी क्र. ५, अर्जदार कंपनी क्र. ६ आणि अर्जदार कंपनी क्र. १ च्या सुरक्षित धनकोंच्या सभेची आवश्यकता नाही.

लेखापरीक्षकांच्या प्रमाणपत्राद्वारे सत्यापित केल्यानुसार, धनको शून्य असल्याने, अर्जदार कंपनी क्र. ५ आणि अर्जदार क्र. ६ आणि अर्जदार क्र. १ व अर्जदार क्र. ३ यांचे असुरक्षित धनको. न्यायाधिकरणाने **सुश्री सविता सिंगला, [(मोबाईल +९१ ९९३००६५७७६) (ईमेल आयडी savita@cssavitasingla.in)]** यांची नियुक्ती केली आहे.

उक्त बैठकांच्या अध्यक्षा. न्यायाधिकरणाने **सुश्री सोनिया गोयल, [(मोबाईल +९१ ९७०२०७७३४९) (ईमेल आयडीः soniay.agarwal.sg.@gmail.com)** यांची उक्त बैठकांच्या छाननीकर्ता म्हणून नियुक्ती केली आहे.

उपरोक्त विलीनीकरण योजना, जर सभांमध्ये मंजूर झाली, तर ती माननीय न्यायाधिकरणाच्या त्यानंतरच्या मंजुरीच्या अधीन राहील.

दिनांक २७ जुलै, २०२६
ठिकाणः मुंबई

एसडी/-
सविता सिंगला
सभांसाठी नियुक्ती करण्यात आलेले अध्यक्ष.

बँक ऑफ महाराष्ट्र

नोंदणीकृत कार्यालय : 'लोकमंगल', 1501, शिवाजीनगर, पुणे - 411005 | **शाखेचा पत्ता :** मिड-कॉर्पोरेट शाखा, युनिट क्र. जी-1, तळमजला, श्रद्धा हाऊस, किंग्जवे रोड, नागपूर - 440001.

तामिळनाडू राज्यातील एचएएम रस्ता प्रकल्पामध्ये (बांधकाम प्रगतीपथावर) स्विस चॅलेंज प्रक्रियेद्वारे कन्सेशनेअरच्या बदलीसाठी स्वारस्य अभिव्यक्ती आमंत्रण

बँक ऑफ महाराष्ट्र **("बीओएम"/"कर्जदात्यांचे प्रतिनिधी")**, कर्जदात्यांच्या संघटनेच्या (एकत्रितपणे "कर्जदाता") वतीने, पात्र बोलीदाराकडून **("अँकर बोलीदार")** कन्सेशनेअरच्या जागी नामनिर्देशित कंपनीची नियुक्ती करण्यासाठी, कर्जदात्यांना **"जसे आहे तेथे", "जैसे आहे तसे", "ज्या स्थितीत आहे त्या स्थितीत", "जे काही उपलब्ध आहे" आणि "कोणत्याही पुनरावृत्तीच्या अधिकाराशिवाय"** या तत्वावर एक प्रस्ताव ("अँकर बोली") प्राप्त झाला आहे. सदर कन्सेशनेअरला भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने **("प्राधिकरण")**, डिझाईन, बांधकाम, संचालन व हस्तांतरण **("डिबीओटी")** पद्धतीने, वार्षिक देयक आधारावर, तामिळनाडू राज्यातील चार-लेन रस्ता प्रकल्पाचा **("प्रकल्प")** कन्सेशन प्रदान केला होता.

त्याअनुषंगाने, बीओएम पात्र तांत्रिक व आर्थिक क्षमता असलेल्या संस्था/बोलीदारांकडून ("निवडीत बोलीदार") अँकर बोलीविरुद्ध बंधनकारक व अपरिवर्तनीय प्रतिविदा मागविण्यासाठी, सर्व रोख तत्त्वावर, **स्विस चॅलेंज प्रक्रिया** राबविण्याचा मानस व्यक्त करीत आहे. या प्रक्रियेचा उद्देश किंमत शोध करणे, मूळ कन्सेशनच्या उर्वरित कालावधीसाठी कन्सेशनेअरची बदली करणे आणि निवडीत बोलीदारास प्रकल्पाचा ताबा देणे **("बोली प्रक्रिया")** हा आहे.

या संदर्भात, बीओबी कॅपिटल मार्केट्स लिमिटेड **("बीओबीसीएपीएस")** यांची कर्जदात्यांना सदर बोली प्रक्रिया व त्यासंबंधित बाबींवर सल्ला देण्यासाठी तसेच बोली प्रक्रिया पूर्णत्वास नेण्यासाठी प्रक्रिया सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. एससीपी ही प्रक्रिया इलेक्ट्रॉनिक लिलाव प्रणालीद्वारे बोली प्रक्रिया दस्तऐवज **("बीपीडी")** तसेच 22 जुलै, 2026 रोजीच्या चौथ्या परिशिष्टासह नमूद केलेल्या अटी व शर्तीनुसार राबविण्यात येईल.

कर्ज व स्विस चॅलेंज प्रक्रियेची प्रमुख माहिती :

तपशील	माहिती
30 एप्रिल, 2026 रोजीची थकबाकी कर्जरक्कम	रु. 415.39 कोटी (रु. 40.45 कोटींच्या एमएबीजी वगळून)
संभाव्य बोलीदारांकडून स्वारस्य अभिव्यक्ती कागदपत्रे सादर करण्याची अंतिम तारीख	3 ऑगस्ट, 2026 रोजी सायंकाळी 5.00 वा. (आयएसटी)
व्हिडीआर प्रवेश व ड्यू डिलिजन्स पूर्ण करण्याची अंतिम तारीख	17 ऑगस्ट, 2026
ई-लिलावाची तारीख	18 ऑगस्ट, 2026
अँकर बोलीची रक्कम	रु. 152.00 कोटी (संपूर्ण रोख रकमेच्या आधारावर)
मार्क-अप (अँकर बोलीच्या 5%)	रु. 7.60 कोटी
प्रतिविदेसाठी राखीव किंमत (बोलीची प्रारंभिक किंमत)	रु. 159.60 कोटी (संपूर्ण रोख रकमेच्या आधारावर)
बोली वाढीची रक्कम	किमान रु. 2.00 कोटी आणि त्याच्या पटीत

ई-लिलाव 3 जून, 2026 रोजीच्या बोली प्रक्रिया दस्तऐवज ("बीपीडी") तसेच 22 जुलै, 2026 रोजीच्या चौथ्या परिशिष्टासह नमूद केलेल्या अटी व शर्ती, पात्रता निकष आणि कार्यपद्धतीनुसार आयोजित करण्यात येईल. सदर बीपीडी व चौथे परिशिष्ट हे बीओबीसीएपीएसच्या संकेतस्थळावर (www.bobcaps.in/tenders) आधीच अपलोड करण्यात आले आहे.

स्वारस्य अभिव्यक्ती **("ईओआय")** तसेच इतर आवश्यक कागदपत्रे बीपीडी मध्ये नमूद केलेल्या स्वरूपानुसार **("ईओआय कागदपत्रे")** सादर करावीत. इच्छुक बोलीदारांनी ईओआय व ईओआय कागदपत्रे यांची इलेक्ट्रॉनिक प्रत project.alpha@bobcaps.in आणि brmgr2828@bankofmaharashtra.bank.in या ई-मेल पत्त्यांवर पाठवावी. त्यानंतर, ई-मेल पाठविल्यापासून 2 (दोन) कामकाजाच्या दिवसांच्या आत, त्यांची हार्ड कॉपी (इच्छुक पक्षाच्या जोखीम व खर्चाने) प्रत्यक्ष, टपालाद्वारे किंवा कुरिअरद्वारे, सीलबंद लिफाफ्यात "Expression of Interest under SCP for Substitution of Concessionaire undertaking road project in the state of Tamil Nadu" **हा मजकूर नमूद करून प्रति : मुख्य व्यवस्थापक, मिड कॉर्पोरेट शाखा (एमसीबी), बँक ऑफ महाराष्ट्र, युनिट क्र. G-1, तळमजला, श्रद्धा हाऊस,, किंग्जवे रोड, नागपूर – 440001,** महाराष्ट्र, भारत या पत्त्यावर सादर करावी.

आवश्यक कागदपत्रे प्राप्त झाल्यानंतर व बोलीदारांची पात्रता तपासल्यानंतर, पात्र ठरलेल्या निवडक बोलीदारांना आभासी डेटा कक्ष ("व्हीडीआर") मध्ये प्रवेश देण्यात येईल तसेच ड्यू डिलिजन्स करण्यासाठी आवश्यक अतिरिक्त माहिती उपलब्ध करून देण्यात येईल. ड्यू डिलिजन्सचा कालावधी, पात्रता निकष, पत्रव्यवहाराचे वेळापत्रक, ई-लिलाव व इतर संबंधित बाबींचे तपशील बीपीडी तसेच चौथ्या परिशिष्टात नमूद केलेले आहेत.

BOBCAPS (Wholly owned subsidiary of Bank of Baroda) | **बीओबी कॅपिटल मार्केट्स लिमिटेड** | **नोंदणीकृत कार्यालय :** 1704, बी विंग, 17 वा मजला, परिनी क्रेसेन्झो, प्लॉट क्र. सी-38/39, जी ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई - 400051.

कोणत्याही स्पष्टीकरणासाठी कृपया खालील व्यक्तींशी संपर्क साधावा :

संपर्क व्यक्ती	संस्था	मोबाईल क्रमांक	ई-मेल आयडी
श्री. सागर भद्रा, एव्हीपी	बीओबीसीएपीएस	+917666412395	project.alpha@bobcaps.in
सौ. मैत्री शेठ, व्यवस्थापक	बीओबीसीएपीएस	+919867939303	
श्री. अजीत कुमार मीणा, सीएम	बीओएम	+917755926591	brmgr2828@bankofmaharashtra.bank.in

अस्वीकरण : ही जाहिरात बीओएम आणि/किंवा कर्जदाता आणि/किंवा बीओबीसीएपीएस यांच्या वतीने बोली प्रक्रिया राबविण्याची आणि/किंवा कोणत्याही निवडीत बोलीदाराशी निवड करण्याची कोणतीही वचनबद्धता दर्शवत नाही किंवा तसे समजले जाणार नाही. बीओएम, कर्जदाता आणि/किंवा बीओबीसीएपीएस यांना कोणतेही कारण न देता तसेच कोणतीही जबाबदारी स्वीकारल्याशिवाय, बोली प्रक्रियेतील कोणत्याही टप्प्यावर बोली प्रक्रिया किंवा तिचा कोणताही भाग मागे घेण्याचा, स्थगित करण्याचा, रद्द करण्याचा, कोणतेही/सर्व ईओआय प्रस्ताव स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा तसेच बोली प्रक्रियेत कोणताही बदल करण्याचा पूर्ण अधिकार राखून ठेवलेला आहे. ही जाहिरात कोणत्याही प्रकारचा ऑफर दस्तऐवज नाही. बीपीडी जारी करण्यात आल्यामुळे बीओएम आणि/किंवा कर्जदाता आणि/किंवा बीओबीसीएपीएस हे कोणत्याही निवडीत बोलीदाराची निवड करण्यास बांधील आहेत, असा अर्थ होत नाही. या जाहिरातीत नमूद केलेल्या व्यवहाराशी संबंधित बाबींमध्ये इच्छुक पक्षांनी केलेल्या कोणत्याही खर्चासाठी किंवा व्ययासाठी बीओएम आणि/किंवा कर्जदाता आणि/किंवा बीओबीसीएपीएस कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाहीत.

ही जाहिरात बीपीडी मध्ये नमूद केलेल्या अस्वीकरणे आणि जबाबदारीवरील मर्यादांच्या अधीन आहे.

दिनांक : 29 जुलै, 2026
स्थळ : नागपूर

सही/-
बँक ऑफ महाराष्ट्र यांच्यासाठी
अधिकृत स्वाक्षरीकर्ता